MHLA050004152022

विशेष दिवाणी दावा क्र. ५६/२०२२

**आदेश नि.क्र.२६ वर**

प्रतिवादी क्र.१ यांनी जबाबदावा दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून जबाबदावा स्वीकारण्यात यावा अशी मागणी केली  आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ तर्फे म्हणणे असे की प्रतिवादी क्र.१ ही आजारी असल्याने वेळेत कागदपत्र उपलब्ध न झाल्याने जबाबदावा दाखल करण्यास १५ दिवसांचा विलंब झालेला आहे. न्यायाच्या दृष्टीने विलंब माफ करून जबाबदावा स्वीकारण्यात यावा. वादीच्या वकिलाचे म्हणणे असे की, कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय व वैद्यकीय कागदपत्र दाखल न करता केलेला हा अर्ज दाखल केला आहे. म्हणून अर्ज नामंजूर करावा. अर्ज मंजूर केल्यास खर्च बसवावा.

४. सदरचे प्रकरण हे स्थावर मालमत्तेशी संबंधीत असल्याने या प्रकरणाचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी प्रतिवादी क्र.१ यास जबाबदावा देण्यास झालेला विलंब माफ केल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. उलट अर्ज मंजूर न केल्यास  या प्रकरणी गुंतागुंत निर्माण होणार आहे.  परंतू हा अर्ज मंजूर करतांना प्रतिवादी क्र.१ वर खर्च बसवणे आवश्यक आहे.  म्हणून मी खालील आदेश देतो.

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी क्र. १ यास जबाबदावा देण्यास झालेला विलंब वादीस रक्कम रू. २००/– खर्च देण्याच्या अटीवर माफ केला आहे व जबाबदावा स्वीकारण्यात आला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.08.18 13:07:35 +0530

(प्र. अ. सवदीकर)

दिनांक १७/८/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.